# "महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध : एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्या शाखेअंतर्गत 'मराठी' विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.**


**:- संशोधक -:**

**हानमंत बाबुराव हांडे**

**:- मार्गदर्शक -:**

**प्रा. डॉ. पोतुलवार बालाजी लक्ष्मणराव**

पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र.

पीपल्स कॉलेज, नांदेड


ऑगस्ट - 2023

**पान नं : १ ते ९**

**प्रस्तावना :-**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात बारावे शतक हे 'क्रांतिकारी शतक' म्हणून ओळखले जाते. तत्कालिन समाजजीवनावर आपला अमीट असा ठसा उमटविणारे, समाजाला दिशाहिन व गोंधळलेल्या अवस्थतेतून जागे करून त्यांना नैतिक मूल्यांची शिकवण देणारे, त्यांच्या जीवनात मूलभूत अशा स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणारे क्रांतिसूर्य, जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचे जीवन आणि साहित्य हे वैश्विक दर्जाचे होते.

महात्मा बसवेश्वरांनी जे 'वचन साहित्य' निर्माण केले त्यापाठीमागे त्यांची समाजोध्दाराची तळमळ, वैज्ञानिक दृष्टिकोन, नवी व आदर्श समाजव्यवस्था उभारण्याची दूरदृष्टी व समतावादी भूमिका दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी नव्यानेच रूढ केलेल्या वचन साहित्यात' समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, विज्ञानवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, सदाचार, अहिंसा, स्त्री-पुरुष समानता, दया, परोपकार, क्षमाशिलता, शांतता, प्रसंगी 'कठोर विद्रोह, एकेश्वरवाद, व्यवहारवाद (श्रमप्रतिष्ठा) इ. आधुनिक मूल्यांचा केवळ उद्घोषच केला नहता तर त्याला कृतिशिलतेची जोडही घालून दिलेली आपणास आढळून येते.

तत्कालिन समाजव्यवस्थेत धार्मिक कर्मकांड, जातीयता उच्च-नीच भेदभाव, होम-हवन, पशुहत्या, पाप-पुण्य, विटाळ, अज्ञान, अंधश्रध्दा इ. अनिष्ट प्रथा-परंपरा मोठ्या प्रमाणात चालू होत्या. अशा थोतांड रूढींच्या माध्यमातून मुठकर 'स्वार्थी व पंडीतवर्ग भोळ्या बहुजन समाजाची आर्थिक व मानसिक लूट करून चैन उपभोगत होता. अशा वेळी आपल्या वचन साहित्यातून महात्मा बसवेश्वर पुरोहितशाहींवर परखडपणे हल्ला चढवतांना दिसून येतात.

महात्मा बसवेश्वरांचे व्यक्तिमत्त्व आदर्श अशा स्वरूपाचे होते. त्यामुळे त्यांचे 'वचन साहित्य' हे 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा जाहिरनामाच होता याची प्रचिती त्यांच्या विविध वचनांतून येते. धर्म- जात- वर्ग वर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठता, गरीबी-श्रीमंती अशा सर्व प्रकारच्या भेदभावाला मूठमाती देऊन त्यांनी आपले संपुर्ण आयुष्यच सर्वसामान्य पददलित व उपेक्षितांच्या मानवी हक्कांसाठी वेचले होते. प्रचलित विषम व्यवस्थेवर त्यांनी आपल्या कृती आणि उक्तीतून सडेतोड शब्दांत फटकारे मारले आहेत. याची अनेक उदाहरणे आपल्याला वचनसाहित्यात पाहायला मिळतात.

म्हणूनच चार्वाक, गौतम बुद्ध, महावीर, गुरू नानक, कबीर, चक्रधर स्वामी, संत रवीदास, संत तुकाराम यांच्या प्रमाणेच महात्मा बसवेश्वरही देव व वेद नाकारणारे एक प्रखर बंडखोर समाजक्रांतिकारक होते हे स्पष्ट होते.

समाज प्रबोधन, परिवर्तन करण्यासाठी महात्मा बसवेश्वर व त्यांच्या शेकडो शरण-शरणींनी एकत्र येऊन 12 व्या शतकात जे वाक्य निर्माण केले तेच आज कर्नाटकात 'कन्नड' भाषेत सर्वश्रेष्ठ असलेले 'क्रांतिकारी बचन साहित्य' म्हणून ओळखले जाते. या वचन साहित्याचा प्रभाव दक्षिणेतील संत साहित्यावर जसा होता तसाच महाराष्ट्रातील संत. नामदेव, तुकाराम, मन्मथ स्वामी आदि संताच्या विचारांवरही पडलेला आपणास दिसून येतो. महाराष्ट्रात वारकरी संतांच्या अभंगवाणीला जसे महत्व आहे तसेच कर्नाटकात 'वचन साहित्याला' आहे. मराठीतील काही मोजक्या पण नामवंत अभ्यासक, समीक्षक व अनुवादकांनी वचन -साहित्याचा मराठीत अनुवाद करून वाचकप्रेमी व नबोदित अभ्यासकांसाठी अस्वादक चिकित्सेचा मार्ग मोकळा केला आहे यामुळे एकप्रकारे मराठी साहित्याचा दर्जाच उंचावलेला आहे.

शुद्ध आचरणपद्धती, नैतिकता, बंधुभाव अंगी बाळगून योग्य व सरळ दिशेने वाटचाल करण्यासाठी मानवाला केलेला बहुमोल उपदेश अथवा मार्गदर्शन हेच 'वचन साहित्याचे सार' होय. एवढा समृद्ध व सकस वाङ्मयप्रकार सुमारे ८५० वर्षापूर्वी अनुभव मंटपातून महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या अनुयायांनी लोककल्याणाच्या 'उदात्त भूमिकेतून निर्माण केला. मात्र या क्रांतिकारी वचन साहित्यांकडे म्हणावे तेवढे गांभीर्याने पाहिले जात नाही. तुरळक संशोधन झाले असले तरीही अजूनही वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा प्रचार आणि प्रसार होतांना दिसत नाही. ही शोकांतिका दूर करण्या साठी " महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध : एक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने एक संशोधक / अभ्यासक म्हणून माझा हा अल्पसा प्रयत्न असणार आहे.

**संशोधन विषय निवडीची भूमिका :-**

मला शालेय जीवनापासूनच महामानवांची चरित्रे, कविता आदि साहित्यप्रकार वाचनाची आवड आहे. त्यातच महात्मा बसवेश्वरांचा क्रांतिकारी विचारांचा माझ्यावर खोलवर प्रभाव पडलेला आहे. 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे' या उक्तीप्रमाणेच महात्मा बसवेश्वरांचे 'वचन साहित्य' हे मानवी जीवनाला उन्नत बनविणारे, त्यांना सन्मार्ग दाखविणारे दीपस्तंभच आहे, याची खात्री मला महात्मा बसवेश्व रांचे चरित्र ग्रंथ वाचनातून झाली.

म्हणूनच वचन साहित्यातील विविध जीवनमूल्यांचा प्रचार व प्रसार समाजातील तळागाळापर्यंत व्हावा या जिज्ञासेतूनच प्रस्तुत "महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा शोधःएक अभ्यास." हा विषय निवडण्याचा विचार मी माझे मार्गदर्शक सन्माननीय प्रा. डॉ. बालाजी पोतुलवार सरांपुढे ठेवला. त्यांनी मला अनुमती व प्रोत्साहन दिले. त्यांची प्रेरणा घेऊनच मी सदर संशोधन विषय निवडलेला आहे.

**संशोधनाचे महत्व :-**

साहित्य हे मानवी जीवनाची समीक्षाच असते. कारण मानवी जगण्याचे प्रतिबिंब साहित्यातूनच ठळकपणे उमटून येतात, म्हणून साहित्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. संशोधनाचे महत्व अधोरेखित करताना प्रस्तुत संशोधन विषयाद्वारे समाजाला केवळ मानवी मूल्यांची ओळख करून देणे एवढाच मर्यादित उद्देश नाही. तर यासोबतच १२ व्या शतकातील 'वचन साहित्यातील' सर्वच जीवनमूल्य समाजाला आजही कशी तंतोतत लागू पडतात याची जाणीवही भरकटलेल्या वर्तमान समाजाला करून देणे हेच माझ्या संशोधन विषयाचे महत्वपूर्ण मूल्य असणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे/हेतू :-**

सदर शोधप्रबंधाच्या निमित्ताने संशोधनाची काही उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

1. महात्मा बसवेश्वरांच्या दैदिप्यमान जीवनचरित्र्याचा आणि विचारांचा अभ्यास करणे.
2. महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील विविध मानवतावादी जीवनमूल्यांचा चिकित्सकपणे शोध घेणे.
3. बाराव्या शतकातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाचा मागोवा घेणे.
4. 'वचन साहित्य' या वेगळ्या साहित्य प्रवाहाची ओळख करून देऊन त्याची उपयुक्तता विशद करणे हा महत्वाचा हेतू आहे.
5. वचन साहित्याचा आशय सांगून स्वरूप स्पष्ट करणे.
6. वचन साहित्याचा भाषा शैलीच्या दृष्टिने अभ्यास करून त्यातील महत्वपूर्ण म्हणी, सुभाषिते आणि वाक्प्रचारांचा मूल्यांच्या संदर्भात शोध घेणे.

7. वचन साहित्याचे वाक्यीन श्रेष्ठत्व अभ्यासाअंती सिद्ध करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

"महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा शोधः एक अभ्यास" या विषयानुषंगाने एक संशोधक, अभ्यासक म्हणून शोधप्रबंधाची काही गृहितके मांडून अभ्यास करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे ती गृहितके अशी आहेत.

1. समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व आणि न्याय यासारख्या असंख्य लोकशाही मूल्यांची बीजे १२ व्या शतकातील वचन साहित्यातील शब्दांशब्दांत आढळून येतात.
2. तत्कालिन समाजव्यवस्थेत अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, अनिष्ट रूढी-परंपरांनी उग्र स्वरूप धारण केल्याची माहिती मिळते.
3. बाराव्या शतकात स्त्रीयांनाही दुय्यम दर्जा दिला जात होता, मात्र महात्मा बसवेश्वरांनी पहिल्यांदाच स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करून प्रतिगामी व्यवस्थेचा धिःकार केल्याचे वचन साहित्याच्या अभ्यासातून निष्पन्न होते.
4. वचन साहित्यातून महात्मा बसवेश्वरांच्या क्रांतिकारी विचार व कार्याचा भारतीय समाजजीवनावर मुलगामी परिणाम 'झालेला आपणास दिसून येतो.
5. महात्मा बसवेश्वर लिखित वचन साहित्यातील तत्वज्ञानाचा प्रभाव मराठी संत साहित्यावर सुध्दा पडल्याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जाणवते.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

बसवेश्वर आणि त्यांच्या शेकडों स्त्री-पुरुष अनुयायांनी मिळून हजारो वचने लिहिली आहेत.. उपलब्ध चरित्रग्रंथ व वचन साहित्याचा सविस्तर अभ्यास करतांना संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेऊन मी केवळ महात्मा बसवेश्वरांनीच लिहिलेल्या वचनांचा,

त्यातील जीवनमूल्यांचा बारकाईने अभ्यास करणार आहे. म्हणून प्रस्तूत संशोधन विषयाच्या शीर्षकावरूनच संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निदर्शनास येते.

**संशोधन पद्धती :-**

संशोधनाची उधिष्टे साध्य करण्यासाठी कोणत्याही विषयाच्या संशोधन कार्यात संशोधन पद्धतीला विशेष महत्व असते. अर्थातच मी प्रस्तूत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणालक या संशोधन पध्दतीचा अवलंब करणार आहे.

**संशोधनाची साधने :-**

संशोधन कार्य परिपूर्ण होण्यासाठी संशोधकाला विविध संशोधन साधनांची आवश्यकता भासते. "महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध : एक अभ्यास" या विषयांच्या अनुषंगाने मी अभ्यासपूरक विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वाङ्मय प्रकार, नियतकालिके, शब्दकोश, शोधनिबंध, इंटरनेट वरील महत्वपूर्ण लेख, संबंधित विशेषांक इ. लिखित महत्वाच्या साधनांचा वापर करणार आहे.

**संशोधन अध्ययनाची प्रकरणनिहाय विभागणी**

प्रस्तूत संशोधन कार्य एकूण सहा प्रकरणाद्वारे पूर्ण केले जाणार असून सदर प्रकरणाची रूपरेषा खालील प्रमाणे आहे.

**प्रकरण 1 ले** - महात्मा बसवेश्वरांच्या कालखंडातील धार्मिक व सामाजिक स्थिती.

**प्रकरण 2 रे** - महात्मा बसवेश्वरांचा जीवनसंघर्ष.

**प्रकरण 3 रे** - बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील नैतिकमूल्यांची शिकवण,

**प्रकरण 4 थे** - महात्मा बसवेश्वराच्या साहित्यातील बुद्धीवाद व विज्ञानवादाचे स्वरूप.

**प्रकरण 5 वे -** महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याची शैली.

**प्रकरण 6 वे -** मूल्यमापन व उपसंहार

या शेवटच्या प्रकरणात एकूण प्रकरणांचा सारांशाने आढावा घेऊन योग्य निष्कर्षांची मांडणी करणार आहे.

**संदर्भग्रंथ सूची :-**


1) हळकड्डी डॉ.फ.गु. मूळ कन्नड संपादक अनुवादक करडीगुद्दी प्रा. आर. एम. :- वचनसिध्दांत सार - महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी.

2) कलबुर्गी डॉ.एम.एम - कन्नड मूल, मराठी अनुवादक, श्री. शंकर म.पाटील, सौ. सविता सि.नडकट्टी :- वचन

3) तंगावार डॉ.म.ई. वचनसाहित्यः मराठीतील अनुवाद परंपरा.: स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

4) मेणसे कृष्णा :- श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वरः एक चिंतन लोकवाङ्गयगृह, मुंबई

5) कड़गे डॉ. श्रीदेवी शंकरअप्पा महात्मा बसवेश्वर व्यक्ती आणि वाचयः इसाप प्रकाशन, नांदेड

6) कांबळे डॉ. मिलिंद, सोमनाथे डॉ. ईश्वर वीरशैव संप्रदाय आणि महात्मा बसवेश्वरः शोध आणि बोध:- सुधीर प्रकाशन, वर्धा

7) सरदार प्रा. गं. बा. :- संत वाक्याची सामाजिक फलश्रुती लोकवाङ्गयगृह, मुंबई

8) निकम प्रा. गौतम :- संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह : विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव

9) अंजनीकर डॉ. भगवान थोर क्रांतिकारक महात्मा बसवेश्वर महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी (जि. बिदर)

10) नसिराबादकर डॉ.ल.रा.: प्राचीन मराठी वाक्याचा इतिहास : फडके प्रकाशन, पुणे.

11) शेणोलीकर ह.श्री. प्राचीन मराठी वाङ्गयाचे स्वरूप :- डायमंड पब्लिकेशन, पुणे

12) नसिराबादकर ल.रा :- मध्ययुगीन मराठी वाङ्गयाचा इतिहास भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर

13) देशपांडे सुभाष की. महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व : जनशक्ती वाचक चळवळ

14) मूर्ती एम. चिदानंद : मराठी अनुवादः किंबहुने रवींद्र :- श्री. बसवेश्वर : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

15) तिप्पेरूद्रस्वामी एच. भारतीय साहितायाचे निर्माते बसवेश्वर साहित्य अकादमी, दिल्ली

16) मेनकुदळे डॉ. अशोक गं. समाजसुधारक, महामंत्री महात्मा बसवेश्वर ( संक्षिप्त चरित्र), सुविद्या प्रकाशन, सोलापूर

**संशोधक**

हानमंत बाबुराव हांडे

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. पोतुलवार बालाजी लक्ष्मणराव

मराठी विभाग (पीपल्स कॉलेज, नांदेड)